ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- I JAN - FEB 2023

Original Research Article

# भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांचे सिंहावलोकन

*डॉ. प्रकाश जंगले,

* जोशी- बेडेकर महाविद्यालय, ठाणे

**प्रस्तावना:**

सध्या जगात १९५ राष्ट्रे असून या जगाची विभागणी तीन भागात झालेली आहे. विकसित राष्ट्रे, विकसनशील राष्ट्रे आणि अविकसित राष्ट्रे. भारत हा विकसनशील राष्ट्र म्हणून ओळखला जातो. जगात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा विचार करता अमेरिका, चीन, जपान, जर्मनी आणि इंग्लंड नंतर सहाव्या क्रमांकावर भारताचा जगात सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून नंबर लागतो.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी होती. तर २०२२ मध्ये ती १३० कोटी पर्यंत जाऊन पोहोचलेली आहे. आजही ग्रामीण भागात ६८ टक्के लोकसंख्या राहत असून ती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. तर ३२ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असून ती उद्योग आणि सेवा क्षेत्रावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अवलंबून आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

भारत हा तरुणांचा देश समजला जातो, जवळपास ६४ टक्के लोकसंख्या १५ ते ५९ वयोगटातील आहे. भारतातील लोकांचे सरासरी वय २९ वर्षे इतके असणार आहे. काम करण्याची त्यांची इच्छा आणि क्षमता असताना त्यांना ग्रामीण व शहरी भागात रोजगार मिळत नाही. म्हणून असंख्य तरुणांना बेरोजगारीचा सामना करावा लागतो.ग्रामीण भागात ६ टक्के बेरोजगारीचा दर असून शहरी भागात जवळपास ८ टक्के बेरोजगारीचा दर आहे.

The organization for economic cooperation and development या संस्थेच्या अनुमानानुसार भारतातील बेरोजगारीचा दर ८ टक्के इतका आहे. तर The Centre for monitoring Indian economy या संस्थेच्या अनुमानानुसार भारतातील बेरोजगारीचा दर ८.३ टक्के इतका आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अनुमानानुसार भारताचा विकासदर २०२२ मध्ये ८.२ टक्के इतका असेल. याचा अर्थ भारताचा विकास दर आणि बेरोजगारीचा दर समान असल्यास भारत खऱ्या अर्थाने विकास करू शकणार नाही.

भारतातील घटक राज्यांचा विचार करता सर्वाधिक बेरोजगारी दर हरियाणा २६.५ टक्के, जम्मू-काश्मीर २५ टक्के आणि राज्यस्थान २४.५ टक्के इतका दिसून येतो. असे असले तरी भारत सरकार वेगवेगळ्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. भविष्यकाळात आशादायी चित्र निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- I JAN - FEB 2023

Original Research Article

**उद्दिष्टे:** भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांचा सखोल अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांचा सखोल अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीची मदत घेण्यात आलेली आहे. या संदर्भातील माहिती पुस्तके आणि वेबसाईटच्या माध्यमातून जमा केलेली आहे.

**अभ्यासाचे महत्व:** भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांच्या सखोल अभ्यासामुळे प्रशिक्षणांच्या आणि रोजगाराच्या संधीची माहिती बेरोजगार तरुणांना होणार आहे. तसेच अभ्यासकांना,गुंतवणूक धारकांना, विदेशी कंपन्यांना भारतीय अर्थव्यवस्थेची व्यापकता आणि ताकत लक्षात येणार आहे.

**मेक इन इंडिया:**

हा कौशल्य विकास कार्यक्रम सप्टेंबर २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेला आहे. नेशन बिल्डिंग हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

मेक इन इंडिया हा उपक्रम चार स्तंभावर आधारित आहे.

१) **नवी कार्यपद्धती:** उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी परवाना रहित आणि नियंत्रण नसलेली व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. सुलभ व्यवसायासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात येत आहे.

२) **नव्या पायाभूत सुविधा:** उद्योगाच्या विकासासाठी भारत सरकारने अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी औद्योगिक क्षेत्रे व स्मार्ट सिटी निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामुळे अति वेगवान दळणवळण व्हावे हा मुख्य उद्देश आहे.

३) **नवी क्षेत्रे:** मेक इन इंडिया अंतर्गत उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि सेवा कार्य यातील २५ क्षेत्रे निवडले आहेत. त्याचा तपशील वेब पोर्टलच्या माध्यमातून दिला गेलेला आहे.

४) **नवी विचारसरणी:** सरकार म्हणजे उद्योगावर नियंत्रण अशी समजूत आहे. परंतु मेक इन इंडियाच्या माध्यमातून सरकार उद्योग जगताचा सहकारी बनणार आहे. सरकारचा दृष्टिकोन नियंत्रणाचा नसून सहाय्यकाचा असणार आहे.

थोडक्यात मेक इन इंडिया हा उद्योग क्षेत्रात मैलाचा दगड मानला जात असल्यामुळे देशातील आणि परदेशातील उद्योजक गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. कारण मागील काळातील अपारदर्शी व्यवस्थेची जागा पारदर्शी आणि उपभोक्ता स्नेही व्यवस्थेने घेतलेली आहे. त्यामुळे गुंतवणूक वाढ, कौशल्य विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम, जागतिक दर्जा सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

मेक इन इंडियाच्या माध्यमातून उद्योग, संरक्षण, बांधकाम, रेल्वे इत्यादी क्षेत्रात जागतिक सहकार्य निर्माण झालेले आहे .

संरक्षण क्षेत्रात गुंतवणुकीची मर्यादा २६ टक्के वरून ४९ टक्के करण्यात आलेली आहे. संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी परदेशी गुंतवणूक १०० टक्के खुली करण्यात आलेली आहे. रेल्वेच्या पायाभूत प्रकल्पासाठी १०० टक्के परकीय गुंतवणुकीस मान्यता देण्यात आलेली आहे.

व्यापार सुलभ हवा म्हणून भारत सरकारने कर प्रणाली सुटसुटीत केलेली आहे. उत्पादनाच्या कच्च्या मालावरील उत्पादन शुल्क कमी केलेले आहे. तंत्रज्ञानात गुंतवणूक वाढीसाठी रॉयल्टी वरील इन्कम टॅक्स २५ टक्के वरून १० टक्के केलेला आहे. आयात निर्यातीसाठी लागणारी कागदपत्र संख्या कमी करण्यात आलेली आहे. गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करण्यासाठी गुंतवणूक सुलभ विभागाची निर्मिती केलेली आहे.

**मेक इन इंडिया उपलब्धी:**

गेल्या आठ वर्षात भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीत जवळपास दुप्पट वाढ झालेली आहे. २०१४-१५ मध्ये ४५ अरब डॉलर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झाली होती. तर २०२१-२२ मध्ये ८३ अरब डॉलर विदेशी गुंतवणूक झालेली आहे. या कार्यक्रमांतर्गत ४,५८,९६४ तरुणांना कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे नोकरी उपलब्ध झालेली आहे.

जगातील १०१ देशांनी ३१ राज्य व व केंद्रशासित प्रदेशातील ५७ वेगवेगळ्या क्षेत्रात गुंतवणूक केलेली आहे. १०० अरब डॉलर इतकी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणणे हे भारत सरकारचे लक्ष्य आहे. खेळणी उद्योगात ६३६ टक्के गुंतवणुकीत वाढ झालेली आहे. तर २६०१ करोड रुपये निर्यात झालेली आहे. मोबाईल फोन निर्यातीत २५० टक्के वाढ झालेली आहे.

**स्किल इंडिया:**

हा कौशल्य विकास कार्यक्रम जुलै २०१५ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेला आहे. देशातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणे हा या मिशनचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमांतर्गत देशातील २४ लाख बेरोजगार तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य भारत सरकारने ठेवले होते.

स्किल इंडिया मिशन ही प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आणि उद्यमिता मंत्रालयाची प्रमुख योजना आहे. भारतीय युवकांना प्रशिक्षण देऊन सक्षम बनविणे व उपजीविका करण्यास मदत करणे हा उद्देश होता. दहावी किंवा बारावी किंवा त्यापेक्षा कमी शिकलेल्या तरुणांना या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण दिल्या जात होते.

बेरोजगारांना फीस देण्याची गरज नव्हती. उमेदवार तीन महिने, सहा महिने किंवा एक वर्ष कोर्ससाठी नाव नोंदणी करू शकत होता. अभ्यासक्रम पूर्ण केल्यास प्रमाणपत्र दिले जात होते. हे प्रमाणपत्र देशभरात वैध समजल्या जात होते. त्यामुळे देशभरात कोठेही रोजगार मिळू शकत होता. यातून बेरोजगारीची समस्या कमी होणार होती.

बेरोजगार तरुणांना बांधकाम, इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, फर्निचर, फिटिंग, हस्तकला,

चामड्याचा उद्योग, ड्रायव्हिंग, शिवणकाम, जेवण, मेकॅनिक इत्यादी ४० तांत्रिक क्षेत्रात प्रशिक्षण दिल्या जात होते.

थोडक्यात या योजनेला राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान असे म्हणतात. स्वतः रोजगार मिळवणे व इतरांना रोजगार देण्यासाठी बेरोजगार तरुणांना प्रशिक्षण देऊन सक्षम बनवल्या जात होते. दर पाच वर्षाला एक कोटी प्रशिक्षण देण्याचे सरकारचे लक्ष्य होते.

**स्किल इंडिया उपलब्धी:**

देशातील आय. आय. टी. ची संख्या १०७५० (२०१४) वरून १८००० (२०२२) वाढवण्यात आलेली आहे. ४,८२,०७९ बेरोजगारांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**स्टार्टअप इंडिया:**

हा कौशल्य विकास कार्यक्रम १५ ऑगस्ट २०१५ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेला आहे. स्टार्टअप योजना ही नव्या उद्योगासाठीची योजना आहे.

स्टार्टअप उद्योगांना देशात संपत्ती आणि रोजगार निर्मिती म्हणून महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. जगातील तिसरी मोठी संख्या स्टार्टपची भारतात आहे. सरकार या उद्योगांना सरकारी कंत्राटी घेण्यासाठी अनेक प्रकारची सूट देणार आहे.

स्टार्टअपचा उद्देश हा व्यापक स्वरूपाचा आहे. उदा. नव उद्योगांना प्रोत्साहन देणे, देशात रोजगार निर्मिती घडून आणणे, सरकारी नियम व बंधने कमी करणे, परवानाराज समाप्त करणे, परकीय गुंतवणुकीतील अडथळे समाप्त करणे, महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे, वेब पोर्टल द्वारे रजिस्ट्रेशन सोपे करणे इत्यादी.

स्टार्टअपसाठी भारत सरकारने काही महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत. उदा. नव्या उद्योगासाठी दहा हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. नव्या उद्योगांना सुरुवातीचे तीन वर्षे आयकर सवलत देण्यात आलेली आहे. कॅपिटल गेन्सवर भारत सरकारने टॅक्स सूट दिलेली आहे. नव्या उद्योजकाला पेटंट नोंदणी करायचे असल्यास पेटंट शुल्कात ८० टक्के सूट देण्यात आलेली आहे. सरकारी खरेदीत नव्या उद्योगांचा माल सरकारने घेण्याचे आश्वासन दिलेले आहे.

थोडक्यात नव्या उद्योजकांना नव्या संधी देऊन भारत सरकारने गुंतवणुकीला प्रोत्साहन दिलेले आहे. अधिकाधिक रोजगार निर्मिती घडवून आणणे हा त्या पाठीमागचा मुख्य उद्देश आहे. अपेक्षित रोजगार निर्मिती घडून आल्यास भारताला आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास करणे सहज शक्य होणार आहे. परिणामी भारत हा विकसित राष्ट्राच्या दिशेने समर्थपणे एक पाऊल पुढे टाकणार आहे.

**समारोप:** भारतासारख्या विकसनशील पण वेगाने प्रगती करणाऱ्या देशात विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज वाढत आहे. उद्योग क्षेत्रातील संधीचा फायदा घेण्यासाठी भारतीय तरुणांना आधुनिक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- I JAN - FEB 2023

Original Research Article

तंत्रज्ञानानुसार कौशल्य आधारित प्रशिक्षण देऊन उत्पादनक्षम बनवण्यात येणार आहे. म्हणूनच कौशल्य विकास कार्यक्रमाला राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आलेले आहे.

कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत १५ ते ४५ वयोगटातील युवकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. राष्ट्रीय स्तरावर कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केलेली आहे तर महाराष्ट्रात रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे रूपांतर कौशल्य विकास व उद्योजकता विभाग असे करण्यात आलेले आहे. प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियान महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. थोडक्यात रोजगार निर्मिती करून आणि स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवून रोजगाराचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**संदर्भ साहित्य:**

Dr.Santanu kumar Das &Suman Chaudhury ‘ Make In India The Road ahead’(2016) S.K. Book Agency, New Delhi.

Prof. Rakesh Kumar Gupta & Dr. Geeta Bansol ‘Make In India destination Made In India’ (2015) Bharti Publication, new Delhi.

https://www.vedantu.com/english/make-in-india-essay

https://www.pmindia.gov.in/mr/government_tr_rec/%E0%A4%AE%E0%A5%87%E0%A4%95-%E0%A4%87%E0%A4%A8-%E0%A4%87%E0%A4%82%E0%A4%A1%E0%A4%BF%E0%A4%AF%E0%A4%BE-2/?comment=disable

https://maharashtratimes.com/government-policy/central-government-policy/skill-india-mission-benefits-and-objective-part-1/articleshow/89886123.cms

https://www.fincash.com/l/mr/startup-india-scheme

https://maharashtratimes.com/career/career-news/priority-to-skill-development-education-to-grow-in-career/articleshow/79473778.cms

*Cite This Article:*

***डॉ. प्रकाश जंगले, (2023).*** भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांचे सिंहावलोकन, ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– I, Jan –Feb 2023,*** *204-208.*